# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.11.2024** **वारःरविवार**

---

ठळक बातम्या

- केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून सतर्कतेच्या इशाऱ्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षेत वाढ
- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस.
- ऐन दिवाळीत वेंगुर्ल्यात साजरा होतो आगळा गणेशोत्सव, तर मालवणात पालखी प्रदक्षिणा सोहळ्याची सुरूवात
- काश्मिर खोऱ्याच काल दोन वेगवेगळ्या चकमकीत सुरक्षा दलांकडून तीन दहशतवाद्यांना कंठस्नान
- 19 वर्षांखालील जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या कृषी वर्माला सुवर्णपदक.......

आणि

- मुंबईत सुरू असलेल्या भारत - न्यूझीलंडच्या तिसऱ्या कसोटी सामन्याचा निकाल आजच

**फडणवीस सुरक्षा**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. झेड दर्जाच्या सुरक्षेसह, फोर्स वन चे अतिरिक्त 12 जवान उपमुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहेत. केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून आलेल्या सतर्कतेच्या इशाऱ्यानंतर हे पाउल उचलण्यात आलं आहे. फडणवीस यांच्या जीवाला धोका असून त्यांच्याविरूद्ध कट रचले जात असल्याची माहिती यंत्रणांना मिळाली आहे. त्यानुसार उपमुख्यमंत्र्याचं मुंबईचं शासकीय निवासस्थान तसंच नागपूर निवासस्थानीही सुरक्षा पुरवण्यात आली आहे.

**विधानसभा निवडणूक**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची उद्या, सोमवारी शेवटची तारीख आहे. राज्यातल्या दोन प्रमुख महायुती आणि महाविकास आघाडी आपापल्या पक्षातल्या बंडखोरांना शांत करण्याच्या प्रयत्नात दिसून आले. महायुतीचे 36 तर महाविकास आघाडीचे 26 उमेदवार बंडखोरीच्या पावित्र्यात आहेत. महायुतीच्या मोर्शी, आष्टी, श्रीरामपूर, दिंडोरी, देवळाली, अणुशक्तीनगर, मानखुर्द इथल्या उमेदवारांनी परस्परांविरोधात उमेदवारी अर्ज दाखल गेले आहेत. तर महाविकास आघाडीत परंडा, पंढरपूर, दिग्रस, धारावी, मानखुर्द, सोलापूर शहर मध्य, सांगोला आणि लोहा या आठ जागांवर परस्परांविरोधात उमेदवार उभे गेले आहेत. त्यामुळे, सोमवारनंतर राज्यातल्या प्रमुख पक्षांच्या जागावाटपाचं चित्र स्पष्ट होणार आहे.

**निवडणूक खर्च**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडून त्यातून व्यवहार करणं आवश्यक असल्याची सूचना भारत निवडणूक आयोगानं खर्चाविषयी जारी सुचनांमध्ये नमूद केली आहे. उमेदवारानं निवडणूक खर्चासाठीची रक्कम बँक खात्यात जमा करणं आवश्यक आहे. व्यवहारही रोखीनं न करता धनाकर्ष, धनादेश आदी माध्यमातून करायचे असल्याचंही त्यात म्हटलं आहे. शिवाय उमेदवारांन त्याच्यावर कोणतेही गुन्हे दाखल नसल्याची

जाहिरात प्रसिद्ध करणं आवश्यक असून, त्याचा खर्च निवडणूक खर्चाची बाब म्हणून गृहित धरण्यात येईल असंही सुचनांमध्ये नमूद केलं आहे.

**अहिल्या नगर निवडणूक**

महाराष्ट्रासाठी नियुक्त करण्यात आलेले विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांनी काल अहिल्यानगरमध्ये निवडणूक तयारीचा आढावा घेतला. जिल्ह्यातल्या सर्व मतदारसंघात विविध यंत्रणांमध्ये समन्वय, निवडणूक प्रशासनाची पूर्वतयारी आणि निवडणुका मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त केले. तसंच आतापर्यंत विविध पथकांद्वारे 28 कोटी 26 लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. शिर्डी आणि राहुरी मतदारसंघात प्रत्येकी एक सहाय्यकारी मतदान केंद्र स्थापित करण्यात येणार असून, 232 मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची सुविधा पुरवण्यात येणार असल्याचंही मिश्रा यांनी सांगितलं.

**भाजप प्रवेश**

नवी मुंबई महापालिकेचे माजी महापौर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक यांनी काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

**अनिस अहमद काँग्रेसप्रवेश**

तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केलेले माजी अनिस अहमद काल पुन्हा स्वगृही म्हणजे काँग्रेसमध्ये परतले.महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या उपस्थितीत त्यांनी पुनर्प्रवेश केला. अहमद यांनी नागपुरातून वंचित कडून अर्ज भरताना काही मिनिटं उशीर झाल्यानं त्यांचा अर्ज स्विकारण्यात आला नव्हता.

**रिपब्लिकन आठवले**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला महायुतीमध्ये सन्मान मिळत नसून लोकसभा, विधानसभेत तसंच कोणत्याही महामंडळातही पक्षाला जागा मिळत नसल्याचं सांगून विदर्भातल्या कार्यकर्त्यांनी रिपाईसोबत राहू पण भाजपसोबत राहाणार नाही अशी भूमिका घेतली आहे. याबाबत पक्षाचे राष्ट्रीय संघटन सचिव भुपेश थुलकर यांनी पक्षाध्यक्ष रामदास आठवले यांनाविदर्भातल्या कार्यकर्त्यांना मोकळीक द्यावी अशी विनंती पत्राद्वारे केली आहे.

**अरविंद सावंत शायना**

शिवसेना उमेदवार शायना एन. सी यांच्याविषयी आक्षेपार्ह टिप्पणी केल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अरविंद सावंत यांनी माफी मागत दिलगीरी व्यक्त केली. मात्र त्यानंतरही शिवसेनच्या उमेदवार शायना एन. सी यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं महिलांबाबत आपली भूमिका जाहीर करावी अशी मागणी वार्ताहरांशी बोलताना केली.

**दिवाळी परभणी**

दिवाळीचा सण कृषीप्रधान संस्कृतिचं वैशिष्ट मानलं जातं. खरिपाचं पीक हाती आल्यानंतर शेतकरी राजा सुखावतो आणि दिवाळीचा सण एकोप्यानं साजरा करतो. परभणीतही खरीपाच्या हंगामाचा समाधानकारक शेवट झाल्यानं दीपावलीचा सण आनंदानं साजरा केला. वसुबारसेला पशुधनाची पूजा करून या सणाला सुरूवात केली. तर पाडव्याच्या दिवशी माहेरी आलेल्या लेकी गाईच्या शेणापासून वेगवेगळ्या मूर्ती सजवून पुजा करतात त्याला पाची पांडवांचा वाडा म्हणून ओळखलं

जातं. दीपावलीचे पाचही दिवस जिल्ह्यात शेतकऱ्यांनी उत्साहानं साजरे केले. शेतकऱ्यांची आता रबी हंगामाच्या पेरणीच्या तयारीची लगबग सुरू झाली आहे.

**सिंधुदुर्ग उभा दांडागणेशोत्सव**
तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या वेंगुर्ले तालुक्यातल्या उभादांडा गावात आगळा गणेशोत्सव ऐन दिवाळीत साजरा केला जातो. शुक्रवारी लक्ष्मीपुजनाच्या दिवशी या आगळ्या गणेशोत्सवाला सुरूवात झाली आहे. ऐकूया अधिक वृत्तांत
वेंगुर्ले उभादांडा गाव एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित आहे. उभादांडा इथं टुमदार अस गणेश मंदिर आहे. मात्र या गणेश मंदिरात परंपरेनुसार दिपावलीत लक्ष्मीपूजन दिवशी वाजत गाजत गणपती बाप्पाचं आगमन होत. त्यानंतर हा उत्सव दररोज पारंपरिक भजन अनेक धार्मिक कार्यक्रमांनी साजरा होतो. या गणपतीचे विसर्जन होळी पौर्णिमेच्या आदल्या दिवशी होत. नवसाला पावणारा असा या गणपतीचा महिमा आहे. इतर दिवशी गणपती मंदिरात गणपतीच्या फोटोच्या प्रतिमेच पूजन नियमित होत. अशा या आगळ्यावेगळ्या गणपती सोहळ्याला लक्ष्मीपूजनापासून सुरुवात झालीय आणि तो होळी पौर्णिमेपर्यंत चालणार आहे.

**मालवण पालखी**
सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या मालवणच्या तीनशे वर्षांची परंपरा असलेल्या पालखी प्रदक्षिणा सोहळ्याला काल बलिप्रतिपदेच्या दिवशी प्रारंभ झाला. मालवणचं ग्रामदैवत श्री देव नारायण आणि श्री देव रामेश्वर यांच्या देवळातून सांगणं करून पालखीतून सवाद्य मिरवणुकीत देव गावभेटीला आणि इतर देवतांच्या भेटीला निघाले. रात्री सोमवार पेठेतल्या रामेश्वर मांड इथं दर्शनासाठी विश्रामासाठी थांबली होती. ग्रामदेवतेच्या पालखीमुळे व्यवहार सुरळीत चालतात अशी स्थानिक व्यापाऱ्यांची श्रद्धा आहे.

**गोंदिया वंचित दिवाळी**
गोंदिया जिल्ह्यातल्या देवरी तालुक्यातल्या दीनबंधू ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्ण प्राशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं अतिदुर्गम भागातल्या सालकेसा तालुक्यातल्या पत्राटोला गावात आमची दिवाळी वंचितांसाठी हा उपक्रम राबवण्यात आला. गावात दिवाळी फराळ, मुलांना नवीन कपडे, शैक्षणिक साहित्याचं वितरण करण्यात आलं. त्याशिवाय, जिल्ह्यात मामा चौकात हा महोत्सव भरवण्यात आला त्यामध्ये देवदेवतांपासून सिनेअभिनेते, जिल्ह्यातले नेते यांच्या रांगोळ्या रेखाटण्यात आल्या होत्या.

**मुष्टीयुद्ध**
अमेरिकेत कोलोरोडो इथं सुरू असलेल्या 19 वर्षांखालील जागतिक मुष्टीयुद्ध स्पर्धेत भारताच्या कृषी वर्मानं 75 किलो वजनी गटात सुवर्णपदकाला गवसणी घातली. तिने जर्मनीच्या लेरीका सायमनला 5-0 ने मात दिली. तर 48 किलो वजनी गटात चंचल चौधरी, 57 किलो वजनी गटात अंजली कुमारी सिंह, 60 किलो वजनी गटात विनी और 70 किलो वजनी गटात आकांक्षा फलासवाल तसंच पुरूषांच्या 75 किलो वजनी गटात राहुल कुंडू यांना आपापल्या अंतिम सामन्यात पराभूत व्हावे लागल्यानं त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

**क्रिकेट**
मुंबई क्रिकेट कसोटीत काल दुसऱ्या दिवसअखेर न्यूझीलंडच्या 9 गडी बाद 171 धावा झाल्या असून त्यांना दुसऱ्या डावात 143 धावांची आघाडी मिळाली आहे. पहिल्या दोनच दिवसात दोन्ही संघांचे मिळून तीन डाव संपवणाऱ्या वानखेडे मैदानाच्या खेळपट्टीवर आता विजयाचं पारडं भारताकडं झुकलं आहे. न्यूझीलंडला पहिल्या डावात 235 धावांवर

रोखल्यानंतर भारत केवळ 28 धावांची आघाडी घेऊ शकला. पाहुण्यांच्या दुसऱ्या डावात रविंद्र जडेजानं 52 धावात 4 गडी तर रविचंद्रन अश्विननं 63 धावात 3 गडी बाद करुन त्यांना रोखून धरलं. आज तिसऱ्याच दिवशी ही कसोटी निकाली ठरणार हे नक्की.

**सिंधुदुर्ग पाऊस**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कालही दुपारनंतर मेघगर्जनेसह पावसानं हजेरी लावली. त्यामुळे कापणीला आलेल्या भातपिकाचं नुकसान झालं आहे. कणकवली तालुक्यात गेल्या चार दिवसांत पावसामुळे स्थानिकांचंही नुकसान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**हवामान**

राज्यात तुरळक ठिकाणी . विदर्भात हवामान कोरड राहील.

**या बरोबर आकाशवाणीवरच्या प्रादेशिक बातम्या संपल्या. नमस्कार.**